DATE
PAGE NO.

वत अर्ज मि
जनतेचे जनमत
रविवार दि. ६ ऑक्टोबर २०१९ ३

मातोश्री वेलबाई देवजी हरिया महाविद्यालयात शारदोत्सव 'पर्व जनजागृतीचे' व्याख्यानमाला

कल्याण : मातोश्री वेलबाई देवजी हरिया कला, विज्ञान, वाणिज्य महाविद्यालत पर्व जनजागृतीचे व्याख्यानमाला सन २००९ पासुन सुरू झालेला हा उपक्रम अखंडीत दहा वर्ष नवरात्रीत घेतला जातो. या उपक्रमास आजपर्यंत ८ हजार विद्यार्थी उपस्थित होते. तसेच ७० ते ८० व्याख्यात्यांनी या व्याख्यानमालेत आपले विचार मांडलेत असा हा प्रबोधनात्मक उपक्रम अभ्यासू तज्ञ वक्त्यांना कॉलेजमध्ये आमंत्रित करुन विविध विषयांची महत्त्वपूर्ण माहिती देऊनन विद्यार्थ्यांच्या व शिक्षकांच्या वैचारीक ज्ञानात भर पडून विकास व्हावा या उद्देशाने हा उपक्रम शाहू शिक्षण संस्था आजही घेत आहे.

दिनांक ३० सप्टेंबर २०१९रोजी या व्याख्यानमालेस सुरूवात झाली पहिल्या दिवशी दुर्गा गुड्डीलू सामाजिक कार्यकर्त्या यांच्या हस्तेउद्घाटन करण्यात आले. नवरात्रौत्सवात विद्यार्थ्यांच्या विचारांना चालना मिळावीआणि पुस्तकी अभ्यासाबरोबरच सामाजिक भान आणि व्यक्तिमत्त्व विकास व्हावा यासाठी प्रबोधनात्मक व्याख्यान आयोजित केली जातात. पहिला विषय - ठजात पंचायत आणि आजची युवा पिढी ठयावर सामाजिक कार्यकर्त्या दुर्गा गुड्डीलू यांनी वैदू समाजात परंपरागत चालत आलेली जात पंचायत आणि घेतले जाणारे निर्णय त्याचा समाजावर युवा पिढीवर होणारा परिणाम यावर समर्पक असे व्याख्यान दिले.

तसेच संस्थेचे सचिव डॉ .गिरीश लटके यांनी समाज़ात असलेल्या रूढी परंपरांचा संशोधनत्मक विचार करून समाजातत बदल कसा घडवून आणला पाहिजेत यावर अमूल्य असे मार्गदर्शन केले. दि.१ऑक्टोंबर २०१९ रोजी विषय-सायबर गुन्हे आणि त्यात गुरफटणारे तरूण यावर व्याख्यान देण्यासाठी ॲड.तृप्ती पाटील यांनी सोशल मिडियाचा वापर, कायदे आणि होणारी शिक्षा तसेच इंटरनेटच्या माध्यमातून मिळणारी माहिती कितपत सत्य असते यावर खूप चांगले मार्गदर्शन केले. दि.३ ऑक्टो २०१९ रोजी विषय 'लैंगिक शिक्षण आणि वयात येताना' यावर व्याख्यान डॉ. शामकांत जाधव व किरण जाधव यांनी वयात येताना मुलामुलींना येणाऱ्या समस्या, लैंगिक शिक्षण म्हणजे काय वाटणारे शारीरिक आकर्षण आणि आपले आरोग्य याची काळजी कशी घ्यावी याचे मार्गदर्शन विद्यार्थ्यांना केले. तसेच संस्थेचे सचिव डॉ. गिरीश लटके यानी आज व्यसनाधिनतेकडे तरूण पिढी कशी ओढली जाते, कधी स्वत: तर कधी संगतीचा परिणामख त्याही पलीकडे त्यांची बिघडलेली मानसिकता आणि त्याचे होणारे विपरीत परिणाम यावर विद्यार्थ्यांशी शाब्दिक संवाद साधला.

दि.४ ऑक्टो. २०१९ रोजी व्याख्यानमाला विषय - 'स्पर्धा परीक्षा आणि आपण' यावर मार्गदर्शन करण्यासाठी आमच्या कॉलेजचा माजी विद्यार्थी विविध स्पर्धा परीक्षेत यश मिळवून आज आज एक कार्यदक्ष आधिकारी पदावर पोचला आहे. स्पर्धा परीक्षा तयारी कशी करावी, अपयश आले तरी खचून न जाता पुन्हा पुन्हा अभ्यास करत परीक्षा देत राहिल्या कि शेवटी यश मिळतेच त्यासाठी विद्यार्थ्यांनी सतत प्रयत्नशील रहावे.

दि. ५ ऑक्टो. २०१९ रोजी 'वाचन, लेखन व सोशल मेडिया' यावर कवी सुधिर चिते यांनी विद्यार्थ्यांना वाचनातून व्यक्तीमत्व विकास आणि स्वत:चे मत प्रकट करता येते. सोशल मिडीयाद्वारे आपल्याला विविध घटनांचा आढावा कसा घेता येतो. यावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्राचार्या कल्पना सोमनाचे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय बी. ॲड. प्राचार्या वैशाली पाटील यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरण गायकवाड, नम्रता चिंदरकर, तृप्ती धनगर, योगिता पाटील सुनिलकुमार दुबे यांनी केले. कार्यक्रमास बी. ॲडचे प्राध्यापक, I-विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

डॉ. गिरीश लटके लिखित 'के ४६' पुस्तकाचे प्रकाशन

कल्याण, दि. २६ : शाहू शिक्षण संस्थेचे सचिव तसेच पु. ल. कट्टा कल्याणचे सदस्य डॉ. गिरीश लटके यांना विपश्यना केंद्र इगतपुरी येथे विपश्यना करतेवेळी आलेले अनुभव, अडथळे, मनातील आंदोलने यावर आधारित 'के ४६' ह्या पुस्तकाचे प्रकाशन शाहू शिक्षण संस्थेचे अध्यक्ष माजी मंत्री प्रा. लक्ष्मण ढोबळे यांच्या हस्ते आचार्य अत्रे रंगमंदिर, कल्याण येथे नुकतेच संपन्न झाले. यावेळी डॉ. गिरीश लटके यांच्या बहुचर्चित 'मौनानंतरच्या कविता' या काव्यसंग्रहाच्या दुसऱ्या आवृत्तीचे प्रकाशन देखील करण्यात आले.

प्रा. ढोबळे, प्रा. दामोदर मोरे यांची यावेळी भाषणे झाली. यावेळी न्यायमूर्ती ह.भ.प. बबन गोसावी, अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू विजयकुमार चौबे यांचा मानपत्र देऊन विशेष सत्कार करण्यात आला.

यावेळी विचार मंचावर हिंदी कवी विजय पंडित, उद्योगपती गोपाळ चव्हाण, शाहू शिक्षक संस्था कल्याणचे अध्यक्ष जयंत हरिया आदी मान्यवर उपस्थित होते. या मान्यवरांनी डॉ. गिरीश लटके यांच्या लेखन प्रवासाचा व सामाजिक कार्याचा आढावा घेत शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. चिंतामण भोईर यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कवी, नाट्यकर्मी सुधीर चित्ते यांनी प्रसंगानुरूप हिंदी, मराठी काव्य पंक्तीची पखरण करीत केले. यावेळी पुस्तकातील काही भागाचे अभिवाचन अभिनेते सुधाकर वसईकर यांनी करून रसिकांची दाद मिळवली.

या कार्यक्रमास शुभेच्छा देण्याकरिता शेखर लटके,

लोककवी प्रा. प्रशांत मोरे, कवी रमेश आव्हाड, हिंदी कवी मुन्ना पांडे, कवयित्री छाया कोरेगावकर, बाबा रामटेके, राजू रणदिवे, नाट्यलेखक, कवी रमेश करमरकर, सार्वजनिक कल्याणचे सचिव भिकू बारस्कर आदी साहित्य क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्राचार्य सूर्यकांत भोसले, प्रा. कल्पना सोमनाचे, प्रा. वैशाली पाटील, कोमल चंदनशीवे, सुधाकर वसईकर, प्रा. महेंद्र भावसार, अर्जुन डोमाडे, अनिल बागुल यांनी विशेष परिश्रम घेतले.

Scanned with OKEN Scanner

e-mail : dailyjanmat@gmail.com

जनमत

महाराष्ट्राचे सर्वस्पर्शी दैनिक

❖ वर्ष-२९ वे ❖ ❖ अंक २२६ ❖ ❖ बुधवार दि. ८ जानेवारी २०२० ❖

मातोश्री वेलबाई देवजी हरिया कनिष्ठ महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती साजरी

मातोश्री वेलबाई देवजी हरिया कनिष्ठ महाविद्यालयात क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती मोठ्या उत्साहात संपन्न झाली

आज दिनांक ३ जानेवारी २०२० रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची १८९ वी जयंती मोठ्या उत्साहात मातोश्री वेलबाई देवजी हरिया कनिष्ठ महाविद्यालयात सभागृहात साजरी करण्यात आली. या प्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. गिरीश लटके सर, बी.एड.प्राचार्य वैशाली पाटील मॅडम उपस्थित होते. यप्रसंगी डॉ. गिरीश लटके सरांनी समाजातील खरा सावित्री तुम्ही आहात जे कार्य क्रांतीज्योती सावित्रीबाईने त्या काळात केले त्यांची जाणीव जर ठेवायची असेल तर मुलींनी त्या संधीचा फायदा घेत समाजप्रबोधन करणे गरजेचे आहे. स्त्रीयांसाठी चुल-मुल बाजुला करुन शिक्षण घेण्यासाठी दारे उघडली अशा मातेचा विसर न पडावा यासाठी अशा जयंत्या उत्सव साजरा केला जाव्यात.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किरण गायकवाड सरांनी केले. अनेक शिक्षकांनी या प्रसंगी मार्गदर्शन केले व विद्यार्थ्यांनी कविता व माहितीपर महत्व सादर केले.

Scanned with OKEN Scanner